स्क्रीन रिडरचा बादशहा

सांज दैनिक बीड RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित

वास्तव २० वर्षे

एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

ई पेपर वाचा
http://epaper.beedvastav.com
https://www.beedvastav.com

# बीडमधील एका सत्ताधारी पक्षातील माजी आमदार एकनाथ शिंदे यांच्या गळाला!!

**नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत त्यांना पक्षाने डावलल्यामुळे नाराज असलेले माजी आमदार शिंदे सेनेच्या वाटेवर**

**आज भेटण्याची वेळ निश्चित झाल्यामुळे संबंधित माजी आमदार व त्यांचे निकटवर्तीय कालच मुंबईत झाले डेरेदाखल**

**ताकाला जाऊन गाडगे लपविण्यात अर्थ नाही म्हणून शिंदे सेनेत प्रवेश करण्यापूर्वी आपल्या अटी, शर्ती शिंदे सेनेकडे मांडणार!!**

## आज चार वाजेच्या सुमारास मुंबईत औपचारिक बैठक अन् लवकरच होणार प्रवेश

**बीड : प्रतिनिधी**

स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीच्या ऐन तोंडावर आपल्या सोयीच्या राजकारणासाठी अनेक बडे नेते पक्षांतर करताना दिसून येणार आहेत. त्यामध्ये शिवसेना ठाकरे गटाचे गेवराई विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार बदामराव पंडित यांनी नुकताच भाजपामध्ये प्रवेश केला आहे. बदाराम पंडित यांच्यानंतर आष्टी विधानसभा मतदारसंघातील भाजपाचे माजी आमदार भीमराव धोंडे त्याचप्रमाणे केज विधानसभा मतदारसंघाच्या माजी आमदार संगीता ठोंबरे या देखील पक्षांतर करणार असल्याची चर्चा अलीकडच्या काळात जोर धरू लागली आहे. त्यातच बीड जिल्ह्यातील एका माजी आमदाराने राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे यांच्या सेनेमध्ये प्रवेश निश्चित केला असल्याचे खात्रीलायक वृत्त दैनिक 'वास्तव'च्या हाती आले आहे. दैनिक 'वास्तव'ला मिळालेल्या खात्रीलायक वृत्तानुसार संबंधित माजी आमदार आज औपचारिक बैठकीला उपस्थित राहून पक्षप्रवेशाची तारीख निश्चित करणार आहेत. दरम्यान आज दुपारी चार वाजेच्या सुमारास ही बैठक मुंबई येथे होणार आहे.






### कोण कोण असणार बैठकीला!



● बीड जिल्ह्यातील सत्ताधारी पक्षातील माजी आमदार शिंदे गटाच्या शिवसेनेत प्रवेश करणार आहेत.

● या बैठकीला हिरवा कंदील मिळतात संबंधित माजी आमदार कालच मुंबईत डेरेदाखल झाले आहेत. विशेष म्हणजे या बैठकीला शिवसेना शिंदे गटाचे सर्वेसर्वा आणि राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे या आवर्जून उपस्थित राहणार आहेत.

● त्याचबरोबर शिवसेना सचिव संजय मोरे, समाज कल्याण मंत्री संजय शिरसाठ, मराठवाडा संपर्क नेते अर्जुन खोतकर तसेच बीड जिल्हा संपर्कप्रमुख बापूसाहेब मोरे हे नेते या बैठकीला उपस्थित राहणार असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

### बैठकीला एकनाथराव शिंदेंची उपस्थिती असल्यामुळे या प्रवेशाला आले महत्तव!

शिंदे सेनेच्या महत्त्वाच्या नेत्यांसह स्वत : दस्तुरखुर्द राज्याचे उपमुख्यमंत्री तथा शिंदे सेनेचे सर्वेसर्वा एकनाथराव शिंदे यांच्या उपस्थितीत बीड जिल्ह्यातील एका माजी आमदाराचा प्रवेश करवून घेण्यासाठी या औपचारिक बैठकीला एक वेगळे महत्त्व प्राप्त झाले आहे. संबंधित माजी आमदाराने प्रवेश केला तर नक्कीच शिंदे शिवसेना गटाची ताकद बीड जिल्ह्यामध्ये वाढणार असून ज्या पक्षाला ते सोडचिठ्ठी देतील त्या पक्षाचे देखील निश्चितच मोठे नुकसान होणार आहे, यामध्ये तीळ मात्र शंका नाही. त्यामुळेच या माजी आमदारच्या शिंदे गटाच्या शिवसेनेतील पक्ष प्रवेशाला अधिक महत्त्व प्राप्त झाले आहे. आज दुपारी चार वाजेच्यानंतर माजी आमदाराच्या प्रवेशाबाबत स्पष्ट चित्र दिसून येईल.

### नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने डावलल्यामुळे माजी आमदार नाराज!!

● विधानसभा निवडणूक लविढण्यासाठी जोरदार तयारी केलेली असताना नुकत्याच झालेल्या विधानसभा निवडणुकीत पक्षाने ऐनवेळी आपले तिकीट कापले.

● एवढेच नव्हे तर विश्वासात आणि पक्षाच्या कोणत्याही निर्णय प्रक्रियेत घेतले जात नाही या व अशा काही कारणांमुळे त्रस्त असलेले एक माजी आमदार त्यांच्या पक्षाला लवकरच सोडचिट्ठी देत एकनाथराव शिंदे यांच्या सेनेत प्रवेश करण्यासाठी इच्छुक असून आज ते मुंबई येथील बैठकीत पक्ष प्रवेशाची तारीख निश्चित करण्यासाठी डेरेदाखल झाले आहेत. शिंदे सेनेकडून हिरवा कंदील मिळताच त्यांनी काल मुंबई गाठली. दैनिक 'वास्तव'ला मिळालेल्या प्राप्त माहितीनुसार आज चार वाजेच्या सुमारास ही बैठक सुरू होणार आहे.

### अटी, शर्ती समोर ठेवूनच करणार प्रवेश!

● शिंदे सिनेमध्ये प्रवेश करण्यासाठी डेरेदाखल झालेले बीड जिल्ह्यातील एक माजी आमदार आपल्या अटी आणि शर्ती राज्याचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेना शिंदे गटाचे सर्वेसर्वा एकनाथराव शिंदे यांच्यासमोर ठेवणार आहेत.

● आपल्या अटी आणि शर्ती मान्य झाल्या तर लगेचच आपला पक्ष प्रवेश निश्चित करणार असल्याचा ठाम निर्णय संबंधित माजी आमदाराने घेतला असल्याचे खात्रीलायक वृत्त आहे.

● दरम्यान आज चार वाजेनंतर मुंबई येथे ही बैठक आयोजित केली आहे. दरम्यान आपल्या ज्या अटी आणि शर्ती आहेत त्या मान्य होतील असा आशावाद संबंधित माजी आमदाराने शिंदे गटाच्या नेत्यांकडे व्यक्त केला आहे.

---

**महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांनीही केले धक्कादायक खुलासे**

**➤ फोटो खराब असल्यामुळे त्या दोघांमध्ये पुन्हा वाद**

# डॉक्टर अन् प्रशांत रिलेशनशीपमध्ये होते! प्रशांतने लग्नास नकार देताच संपदाने उचलले टोकाचे पाऊल!!

**त्या दोघांमध्ये दुरावा निर्माण झाला होता! परंतु, महिन्याभरापूर्वी प्रशांतला डेंगू झाल्यानंतर ते पुन्हा एकत्र आले!!**

**पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्याशी डॉक्टर संपदा यांचा जो संपर्क तो मागील सहा महिन्यांपूर्वीच थांबला होता!!**

**डॉक्टर संपदा यांनी तीन वेळा बदली नाकारली. त्यामुळे विशेष नियुक्तीद्वारे त्यांना फलटणमध्येच कायम ठेवण्यात आले!!**



**➤ सातारा : प्रतिनिधी**

आत्महत्या केलेली डॉक्टर तरुणी आणि आरोपी प्रशांत बनकर यांच्यात जवळीक (रिलेशनशिप) होती. त्यांच्यात दुरावा निर्माण झाला होता. मात्र, महिनाभरापूर्वी प्रशांतला डेंग्यू झाल्यानंतर दोघे पुन्हा एकत्र आले. प्रशांतने लग्नास नकार दिल्याने तिने आत्महत्या करण्याची धमकीही दिली होती, असे पोलिस तपासात पुढे आले आहे. दरम्यान या अनुषंगाने महिला आयोगाचे अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी देखील धक्कादायक खुलासे केले आहेत. त्या म्हणाल्या की, पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्याशी डॉक्टर संपदा यांचा जो संपर्क तो मागील सहा महिन्यांपूर्वीच थांबला होता. दरम्यान या एकंदरीत प्रकरणांमध्ये उपजिल्हा रुग्णालयाची तक्रार निवारण समिती आणि पोलीस यांच्यामध्ये आरोपपत्र होते. त्या दरम्यान डॉक्टर संपदा यांनी तीन वेळा बदली नाकारली. त्यामुळे विशेष नियुक्तीद्वारे त्यांना फलटणमध्येच कायम ठेवण्यात आले.

### डॉक्टरने आत्महत्या करण्याआधी दोन्ही आरोपींना शेवटचे केले होते मेसेज!

● 'फलटणमधील महिला डॉक्टरने आत्महत्या करण्याआधी आरोपी आणि घरमालक प्रशांत बनकर याला शेवटचा मेसेज केला होता. मात्र, पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने याच्याशी त्यांचा संपर्क सहा महिन्यांपूर्वीच थांबला होता,' अशी माहिती राज्य महिला आयोगाच्या अध्यक्ष रूपाली चाकणकर यांनी सोमवारी फलटण (जि. सातारा) येथे दिली. चाकणकर यांनी सोमवारी फलटण उपजिल्हा रुग्णालयाला भेट देऊन तेथील अधिकाऱ्यांशी चर्चा केली आणि महिला डॉक्टर आत्महत्या प्रकरणी माहिती घेतली. त्यानंतर त्या पत्रकारांशी बोलत होत्या.

### डॉक्टर आणि प्रशांत यांचे अनेक कॉल्स आणि मेसेज पोलिसांना मिळाले!!

● डॉक्टर तरुणीच्या मृत्यू प्रकरणात आतापर्यंत प्रशांत बनकर आणि निलंबित पोलिस उपनिरीक्षक गोपाळ बदने यांना अटक करण्यात आली आहे. तपासात मिळालेल्या माहितीबाबत पोलिसांनी सांगितले, की डॉक्टर तरुणी आणि प्रशांत बनकर रिलेशनशिपमध्ये होते. काही महिन्यांनी त्यांच्यात वाद झाल्याने प्रशांत तिला टाळू लागला होता. दोघांमध्ये अनेक कॉल झाले आहेत. व्हॉट्सअप मेसेजही आहेत, ते पोलिसांनी मिळवले आहेत.

### डॉक्टर आणि प्रशांत रिलेशनशिप मध्ये होते!

प्रशांत बनकर डॉक्टर तरुणीच्या घर मालकाचा मुलगा आहे. तपास पथकातील एका अधिकाऱ्याने सांगितले की, डॉक्टर आणि प्रशांत रिलेशनशिप मध्ये होते. त्या दरम्यान काय काम असतं त्यांच्यामध्ये बिनसले होते. परंतु, गेल्या महिन्यात प्रशांत बनकरला डेंग्यू झाला. त्यानंतर दोघांमधील प्रेमसंबंध पुन्हा वाढले. दिवाळीमध्ये लक्ष्मीपूजनाच्या दिवशी फोटो काढण्यात आले होते. परंतु, काही फोटो खराब असल्यामुळे त्या दोघांमध्ये पुन्हा टोकाचा वाद निर्माण झाला. या वादामधूनच प्रशांतने डॉक्टरच्या रूमला लॉक लावले. यामुळे डॉक्टर संपाद यांनी मंदिरामध्ये जाणे पसंत केले. परंतु, प्रशांत बनकर याच्या वडिलांनी त्यांची समजूत घालून पुन्हा घरी आणले. मात्र त्या घरी न थांबता हॉटेलवर थांबणे ● पान २ वर...

---

## अर्जुना एज्युकेशनल ग्रुप व इंजि. कृष्णा नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली एस.टी. विद्यार्थिनीचा न्यायासाठी लढा!!

**छत्रपती संभाजीनगर उच्च न्यायालयात याचिका दाखल**




**छत्रपती संभाजीनगर : प्रतिनिधी**

दि. २७/१०/२०२५ शैक्षणिक समानतेसाठी आणि न्यायाच्या हक्कासाठी लढा देत मोरे अक्षरा तान्हाजी (वय १८) या अनुसूचित जमात (एस.टी.) प्रवर्गातील विद्यार्थिनीने छ. संभाजीनगर येथील उच्च न्यायालयात सार्वजनिक हित याचिका दाखल केली आहे. महाराष्ट्र राज्य सीईटी सेलने इतर मागास प्रवर्गांना (एस.सी., ओ.बी.सी., व्ही.जे., एन.टी., एस.बी.सी.) जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली असताना, एस.टी. प्रवर्गातील विद्यार्थ्यांना ● पान ३ वर...

## जालिंदर साळुंके यांना पत्नी शोक



**➤ बीड : प्रतिनिधी**

तालुक्यातील नागपूर खुर्द येथील माजी सरपंच जालिंदर साळुंके यांच्या पत्नी संजीवनी जालिंदर साळुंके यांचे दिर्घ आजाराने दि. 27 ऑक्टोबर सोमवार रोजी दुपारी 1 वा. निधन झाले. त्यांच्या पश्चात पती जालिंदर साळुंके, मुले सतिष साळुंके व नितीन साळुंके, मुलगी यशोदा, नातवंड, दीर भाऊजाई खूप मोठे कुटुंब आहे.

## आजचे राशि भविष्य

### मेष रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर आजचा या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु आजचा भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून आजचापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### मिथुन रास

➤ या राशीसाठी आजचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे.

### कर्क रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. आजचा तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास आजचा यशस्वी होईल.

### सिंह रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण आजचा गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कन्या रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. आजचा एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल.

### तूळ रास

➤ आजचा, तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी आजचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो.

### वृश्चिक रास

➤ आजचा तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल.

### धनु रास

➤ आजचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल. तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल. अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत:च्या कामात लक्ष द्यावे. जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता. जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर आजचा ती सुधारेल. कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल. एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### मकर रास

➤ या दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. आजचा तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु आजचा कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका. आजचा तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते. मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील.

### कुंभ रास

➤ या राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस चांगला राहणार आहे. व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल. जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते. जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते. विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते. ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो.

### मीन रास

या राशीसाठी आजचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे. तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील. तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते. तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही आजचा यशाकडे वाटचाल कराल. आजचा व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल. नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील. वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर आजचा ती सुधारेल. तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते.

# तुम्ही आरोग्याची **कशी काळजी घेता?**


विशेष
●क्रांतीवीर शिवराम महिंद्रकर
( योग निसर्गोपचार व संमोहन तज्ञ )
मोबाईल 9423331244

शारीरिक व मानसिक शुद्धता आणि स्फूर्ती शारीरिक चपळता. प्रत्येक व्यक्तीला नेहमीच आपण स्मार्ट दिसले पाहिजे असे वाटते. मग ते सामाजिक जीवनात असो किंवा व्यावसायिक जीवनात परंतु असे दिसून येते की प्रत्यक्ष जीवनात जगत असताना बहुतेक लोक निराश, उदास चेहऱ्याने फिरताना दिसतात आणि ते ज्यांना भेटतात त्यांच्याकडे ते सतत आपल्या दैनंदिन जीवनातील अडचणींबद्दल तक्रार करतात, असे घडते कारण त्यांचे शरीर व मन अस्वस्थ आणि मानसिक विकारांनी भरलेले असते. त्यामुळे तंदुरुस्त दिसण्यासाठी शरीर विकारमुक्त आणि शुद्ध असणे आवश्यक आहे. तंदुरुस्ती मिळवण्यासाठी आणि शरीराला मानसिक विकारांपासून मुक्त करण्यासाठी, तुम्ही खालील

## निसर्गोपचाराच्या सूचनांचे पालन करू शकता:-

■ पुरेसे पाणी प्यावे. पाणी हे शरीर शुद्ध करण्याचे एक शक्तिशाली साधन आहे. शरीराच्या बाह्य शुद्धीसाठी आंघोळ आवश्यक आहे आणि अंतर्गत शुद्धीसाठी पाणी पिणे आवश्यक आहे. पाण्याची विद्राव्यता खूप जास्त आहे. त्यामुळे शरीरातील अनेक विकार त्यात विरघळतात. प्यालेले पाणी जेव्हा लघवी किंवा घामाच्या रूपाने शरीरातून बाहेर पडते तेव्हा ते शारीरिक किंवा मानसिक विकार घेऊन जाते.

■ शुद्ध ( पाश्चराईड ) केलेले अन्नपदार्थ टाळा, पीठ, तांदूळ हे दिसायला चमकदार, पांढरे आणि आकर्षक असतात, पण त्यात कॅलरीजशिवाय इतर कोणतेही पोषक घटक नसतात, त्यामुळे ते शरीराला लठ्ठपणा आणि विकारांचे कारण बनवतात व शरीराला जीवनशैलीशी संबंधित आजार उद्‌भवतात. या आजारांमध्ये मधुमेह, उच्च रक्तदाब इ. आयुष्यभर अशा आजारांनी ग्रासलेली व्यक्ती कशी तंदुरुस्त राहू शकते?

■ स्निग्ध पदार्थ आणि भाज्यांचे अधिक सेवन करा. त्यामुळे फळे आणि भाज्या शरीराला चरबी न बनवता पोषण देऊ शकतात. याशिवाय, त्यात पुरेशा प्रमाणात फायबर असते जे आतड्यांमध्ये विष्ठा जमा होण्यास प्रतिबंध करते.

## जंक फूड टाळा...

■ आजकाल जंक फूडचा ट्रेंड खूप वाढला आहे. शुद्ध अन्नाप्रमाणे, हे अन्न पोषक नसलेले असते. याशिवाय चव वाढवण्यासाठी त्यात जास्त प्रमाणात मीठ टाकले जाते. काही उत्पादक या खाद्यपदार्थांमध्ये अशी रसायने देखील घालतात



ज्यामुळे त्यांना या वस्तू पुन्हा पुन्हा वापरण्यास प्रोत्साहन मिळते. या सर्व पदार्थांमध्ये हायड्रोजनेटेड तेलाचा वापर केला जातो, ज्यामुळे शरीरातील कोलेस्टेरॉलचे प्रमाण वाढते. जे रक्तवाहिन्या आणि धमन्यांचा मार्ग अवरोधित करते आणि हृदयविकाराला आमंत्रण देते. या रोगांचा परिणाम म्हणून शरीर सुस्त होते आणि पोषण कमी होते.

## उपवास करा....

■ उपवास हे शरीर शुद्धीकरणाचे एक विशेष साधन आहे. उपवासाच्या काळात शरीरात नवीन विकारांचा प्रवेश निषिद्ध असतो. आयुर्वेदात असे म्हटले आहे की या काळात शरीरातील रोगांचे सेवन होते. उपवासाच्या काळात अन्नपचनासाठी वापरण्यात येणारा प्राणशक्तीचा भाग विकार दूर करण्यातही सक्रिय होतो. त्यामुळे शरीर विकारमुक्त आणि तंदुरुस्त बनते.

स्टीम बाथ घ्या.

स्टीम बाथमध्ये शरीराला खूप घाम येतो. या घामाने शरीरातील विकारही दूर होतात. स्टीम बाथ झाल्यावर लगेच थंड पाण्याने अंघोळ करण्याचा नियम आहे. त्यामुळे वाफेच्या उष्णतेमुळे त्वचेजवळ येणारे रक्त शरीराच्या अंतर्गत अवयवांकडे वेगाने पाठवले जाते. अशाप्रकारे तीव्र रक्तप्रवाहामुळे शरीरात साचलेले जुने विकार त्यांच्या जागेवरून हलवून नष्ट होण्याच्या मार्गावर येतात. म्हणून, या प्रक्रियेमुळे, खोलवर प्रवेश केलेले विजातीय पदार्थ काढून टाकले जातात.

काढण्याचे काम बराच काळ सुरू होते.

बद्धकोष्ठता होऊ देऊ नका. शरीरातील विकार बद्धकोष्ठतेपासून सुरू होतात. बद्धकोष्ठता टाळण्यासाठी फळे आणि भाज्यांचे सेवन करणे आवश्यक आहे. तरीही, बद्धकोष्ठता उद्‌भवल्यास, एनीमाचा वापर करावा. हे कोणत्याही रेचक औषधापेक्षा अधिक प्रभावी आणि सुरक्षित आहे. काही औषधांमुळे बद्धकोष्ठता देखील होते. असे झाल्यास, आपण ताबडतोब आपल्या डॉक्टरांशी संपर्क साधावा.

दही खा. दही आतड्यांतील अनुकूल जीवाणू वाढवते. हे जिवाणू अन्न पचनात मोठा हातभार लावतात. योग्य पचनामुळे शरीराची चपळता कायम राहते. मोठमोठ्या डेअरी कंपन्यांकडून विकले जाणारे दही या बॅक्टेरियापासून मुक्त असते हे येथे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. म्हणून, या दृष्टिकोनातून ते योग्यतेशिवाय आहे. घरी बनवलेले दही सर्वोत्तम आहे.

## व्यायाम, योगासन, प्राणायाम करा.

■ शरीर शुद्ध करण्यासाठी काही व्यायाम नियमित करणे आवश्यक आहे. या कामात दिवसातून किमान 20 मिनिटे आणि आठवड्यातून सरासरी 40 मिनिटे घालवणे चांगले. व्यायाम कोणताही असो, त्याचा काही भाग डायनॅमिक व्यायामाचा असावा. साधारणपणे, निरोगी राहण्यासाठी चालणे हा एक चांगला व्यायाम आहे.

भरपूर झोप घ्या. झोपेची. काळ प्राणशक्तीला शरीराची झीज दुरुस्त करण्याची संधी देतो. मेंदूलाही विश्रांतीची संधी मिळते. किती झोप आवश्यक आहे हे प्रत्येक व्यक्तीवर अवलंबून असते. तरीही, सामान्य लोकांसाठी, 6-8 तासांची झोप पुरेशी आहे. वरील नियमांचे पालन केल्याने शरीर विकारमुक्त आणि शुद्ध राहील आणि त्यामुळे त्याची चपळता सुनिश्चित होईल.

# उजवा हात नकळत **हृदयाकडे जातो...!**

विशेष
●राजश्री वटे

'नमस्कार' या चार शब्दांप्रमाणेच कृतीतही आपल्या संस्कारांचं प्रतिबिंब आहे. शब्द आणि कृती दोन्ही आदरणीय आहे. समोरच्या व्यक्तीचा आदर शब्दाने व कृतीने केला जातो. शालीनतेची कृती म्हणजे नमस्कार. कुठल्याही पत्राची सुरुवात नमस्काराने होते. तो शि. सा. न. असतो, स. न. वि. वि असतो व सप्रेमही असतो. व्यक्ती सापेक्ष बदलत जातो. पण भाव तोच असतो!

नमस्कार हा अनेक कृतीतून, अनेक भावातून साकारला जातो. आदरयुक्त सादरीकरणातून त्यातील भाव दर्शविला जातो. देवळाची पायरी चढण्यापूर्वी पहिल्या पायरीला वाकून उजव्या हाताने स्पर्शून तोच हात हृदयाला किंवा मस्तकाला स्पर्शीला जातो. हा पूर्ण भक्तिभाव! पुन्हा गाभाऱ्याच्या उंबरठ्याला स्पर्शून तीच क्रिया घडते. नंतर दोन्ही हात जुळवून देवापुढे उभे राहतो, मान झुकवतो, मस्तकाचा स्पर्श जोडलेल्या हातांना होतो. कधी देवासमोर गुडघे टेकवून, माथा देवाच्या चरणी टेकवतो, तर कधी साक्षात दंडवत असतो म्हणजे भक्तिरसाचा आविष्कार!

मंदिरासमोरून जाताना उजवा हात नकळत हृदयाकडे जातो. तेव्हा क्षणभर डोळे मिटले जातात. त्याशिवाय तिथून व्यक्ती पुढे जाऊच शकत नाही, अशी ही संस्कृती!

घरातील वडीलधाऱ्या व्यक्तीच्या पायावर डोके ठेवून साष्टांग नमस्कार केला जातो. मनापासून आशीर्वाद मिळतात. मुठीत खाऊ पण! आदरणीय व्यक्तीपुढे थोडं झुकून दोन्ही हात जोडून सन्मानपूर्वक नमस्कार केला जातो. संवादाची सुरुवात 'नमस्कार' या शब्दाने व कृतीने होते!

परीक्षेला किंवा कोणत्याही महत्त्वाच्या कामाला जाताना, घरातील देवापुढे नमस्कार करून पेपर लिहिण्यास धैर्य दे, यश मिळू दे असे साकडं घातलं जातं. यश मिळाल्यावर, तू माझं ऐकलंस देवा म्हणून जे हात जोडले जातात, त्यात पूर्णत: देवाचाच आशीर्वाद आहे, अशी श्रद्धा असते.



शास्त्रीय नृत्याला सुरुवात करताना, प्रथम जो नृत्याविष्कार केल्या जातो. ही वंदन करण्याची अप्रतिम कृती सादर केली जाते. कलाकार सुद्धा रंगमंचाला नमस्कार करूनच रंगमंचावर पाऊल ठेवतो, रंगदेवतेला वंदन करून!

लग्नातील वधू-वर मांडवात जोडीने सर्वांना वाकून नमस्कार करून सुखी संसारासाठी आशीर्वाद मागतात. यावेळी वधूच्या नमस्काराला बांगड्यांची किणकिण मंजुळ आवाजाची साथ असते. तो एक मंगल सोहळा असतो नमस्काराचा. मेंदीने रंगलेल्या हातांचा!

लहान बाळाला 'जय जय बाप्पा' करायला शिकवतो, तेव्हा त्याचे दोन गोंडस हात जोडले जातात, कपाळाला टेकवले जातात, चेहऱ्यावर आपसूकच हसू असतं. त्यावेळी सगळं जग जणू आपला कौतुक सोहळा बघतो आहे, असे भाव त्या निरागस चेहऱ्यावर असतात! आजकालची पिढी म्हणजे समोरील व्यक्तीच्या गुढघ्यापर्यंत एक हात नेऊन नमस्कार करतात. चला, हेही नसे थोडके!

चालता चालता कोणालाही, लहान असो, मोठे असो चुकून पाय लागला की लगेच चुकलो या भावनेनी नमस्कार केला जातो, एक हात स्पर्शून त्यात एक विनम्र कृतीचा भाव असतो. पुस्तकाला चुकून पाय लागला, तर सरस्वतीचा अपमान व्हायला नको म्हणून बोटांनी स्पर्शून नमस्काराने माफी मागितली जाते. सोडलेल्या दोन हातांपेक्षा जोडलेल्या दोन हातांमध्ये खूप सामर्थ्य असते. परिस्थिती हाताबाहेर जात असेल, तर हात जोडून बघा. मनस्थिती बदलेल व परिस्थिती ही!

कुठलेही महत्त्वाचे काम करताना, मनातल्या मनात नमस्कार केला जातो, एक आधार असतो, या नमस्कारामध्ये! काही जणांना मात्र कोपरापासून करण्याची वेळ येते, अशी आपली नमस्कारमय संस्कारप्रधान संस्कृती दोन हात जुळवून साकार होते.

दिव्यत्वाची जेथे प्रचिती
तेथे कर माझे जुळती!

# उजव्या हातानेच आशीर्वाद का दिला जातो?



## १. उजवा हात शुभ का मानला जातो?

■ आपला उजवा हात हा सूर्य ऊर्जेशी संबंधित आहे, म्हणून उजवा हात शुभ मानला जातो. त्यामुळेच कधीही उजव्या हाताने आशीर्वाद दिल्यास त्या व्यक्तीच्या आयुष्यात सकारात्मकता पसरते.

## २. सकारात्मकतेशी संबंध

■ असे मानले जाते की, मानवी शरीराची उजवी बाजू शक्ती आणि सकारात्मक गुणांनी भरलेली आहे. तर याउलट, डावी बाजूही कमजोरी आणि नकारात्मकतेशी संबंधित आहे.

## ३. नकारात्मक ऊर्जा दूर राहते

■ उजव्या हाताने दिलेला आशीर्वाद हा कोणत्याही नकारात्मक ऊर्जेपासून आपल्याला दूर ठेवते. हिंदू धार्मिक परंपरांमध्ये उजवा हात

**आपल्या हिंदू धर्मात आशिर्वादाला फार महत्त्व आहे. शास्त्रामध्ये अशा अनेक गोष्टी सांगितलेल्या आहेत, ज्यांचे योग्य पालन केल्यास घरामध्ये समृद्धी राहते. कोणतेही शुभ कार्य करायचे असल्यास फक्त उजव्या हाताचा वापर विशेषत: केला जातो, उजवा हाथ शुभ आहे अशी एक धारणा आहे. यामध्ये पहिली गोष्ट येते ती म्हणजे आशीर्वाद. यामध्ये उजव्या हाताने आशीर्वाद देण्याचे महत्त्व सांगितले आहे. पूजा असो, आशीर्वाद असो किंवा कोणतेही शुभकार्य असो, प्रत्येक शुभ कार्य उजव्या हातानेच केले जाते. असे मानले जाते की जेव्हा उजव्या हाताने आशीर्वाद दिल्यास त्या व्यक्तीच्या जीवनात सकारात्मक बदल होतात आणि त्याच्यावर शुभ परिणाम होतात.**

देखील सौर उर्जेच्या विस्ताराशी संबंधित आहे. जे एक आशीर्वाद म्हणून सकारात्मकतेला प्रोत्साहन देते. या कारणास्तव, उजव्या हाताने आशीर्वाद देणे बऱ्याचदा शुभ मानले जाते.

## ४. उजवा हात सक्रिय आहे

■ याशिवाय, एखाद्या व्यक्तीचा उजवा हात डाव्या हातापेक्षा सक्रिय आणि मजबूत असतो, त्यामुळे आपण आपले काम अनेकदा उजव्या हातानेच करतो. ज्या कामांसाठी जास्त ऊर्जा लागते ती कामे उजव्या हाताने केली जातात. उजव्या हाताचा उपयोग बहुतेकदा पवित्र कार्य करण्यासाठी देखील केला जातो.

विशेष

## ५. ज्योतिषीय दृष्टीकोन देखील विशेष आहे

■ ज्योतिषशास्त्रात कोणालाही आशीर्वाद देण्यासाठी त्या व्यक्तीच्या शरीराचा उजवा हात महत्त्वाचा मानला जातो. त्याचबरोबर आपल्या शरीरातील काही भाग हे ग्रहांशी संबंधित आहेत, असेही ज्योतिषशास्त्रात मानले जाते. उजव्या हाताबद्दल बोलणे केले तर ते राशिचक्र चिन्ह लिओ आणि त्याचा शासक ग्रह सूर्य यांच्याशी संबंधित आहे. सिंहाचा शरीराच्या वरच्या भागांवर प्रभाव असतो, जो धैर्य आणि सामर्थ्य दर्शवतो.

## ६. तुम्ही डाव्या हाताने आशीर्वाद का देत नाही?

■ डाव्या हाताने कोणतेही शुभ कार्य केले जात नाही. याचे कारण डावा हात हा शुद्ध मानला जात नाही. म्हणूनच कोणतेही पवित्र कार्य करायचे असल्यास डाव्या हाताला मनाई असते.

## ७. डावा हात अशुद्ध आहे

■ अनेकदा पूजा करताना मुख्यत: उजव्या हाताचा उपयोग केल्याचे तुम्ही पाहिले असेल. याचे कारण म्हणजे उजव्या हाताला शुभ कार्यासाठी पवित्र मानले जाते. याउलट, डावा हात अपवित्र आहे, म्हणून डाव्या हाताने पूजा करणे किंवा कोणतेही शुभ कार्य करणे पूर्णपणे निषिद्ध असते.

## डॉक्टर अन् प्रशांत रिलेशनशीपमध्ये होते! प्रशांतने लग्नास नकार देताच संपदाने उचलले

● पान १ वरून... डॉक्टरांनी पसंत केल्याचे वृत्त आहे.

**तीन वेळा बदली नाकारली म्हणून विशेष नियुक्तीवर तिथेच ठेवण्यात आले!** महिला आयोगाचे अध्यक्ष व रूपाली चाकणकर पत्रकारांशी बोलताना म्हणाल्या, 'मृत डॉक्टरबाबत उपजिल्हा रुग्णालयाची तक्रार निवारण समिती आणि पोलिस यांच्यामध्ये आरोप-प्रत्यारोप होते. त्यातून संबंधित डॉक्टरच्या बदलीची शिफारस करण्यात आली होती. मात्र, त्यांनी तीन वेळा बदली नाकारली. त्यामुळे विशेष नियुक्तीद्वारे त्यांना फलटणमध्येच कायम ठेवण्यात आले.

**बदने आणि डॉक्टर किती वेळा एकत्र आले याची माहिती तांत्रिक विश्लेषणातून मिळेल!** बदने याने चार वेळा बलात्कार केल्याचे सुसाइड नोटमध्ये म्हटले आहे. या संदर्भात विचारता चाकणकर म्हणाल्या, 'पोलिस सीडीआर अहवालाद्वारे अधिक तपास करीत आहेत. ते किती वेळ एकत्र होते, याचीही माहिती तांत्रिक विश्लेषणातून घेतली जात आहे. मार्च २०२५ नंतर संबंधित डॉक्टर आणि बदने यांच्यात संपर्क नव्हता. मात्र, प्रशांत बनकर याच्याशी आत्महत्येच्या घटनेपर्यंत संपर्कात होत्या.

**आत्महत्येपूर्वीच्या मेसेजमधून अनेक महत्त्वपूर्ण बाबी उघड होतील!!** लक्ष्मीपूजनाच्या दिवशी त्यांच्या घरात फोटो काढण्यावरून आणि ते फोटो व्यवस्थित न आल्याने त्यांच्यात वाद झाले होते. त्यानंतर त्या जवळच्या देवळात गेल्या. तेथून बनकरच्या वडिलांनी त्यांची समजूत घालून त्यांना परत आणले. हॉटेलवर जाण्यापूर्वी डॉक्टरांनी बनकरला मेसेज केला. त्याचा मोबाइल बंद होता. आत्महत्येपूर्वीच्या मेसेजमधून अनेक महत्त्वपूर्ण बाबी उघड होतील,' असेही रूपाली चाकणकर म्हणाल्या.

सांजदैनिक बीड वास्तव

सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड -४३११२२ ( महाराष्ट्र ) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ ( महाराष्ट्र ) येथून प्रसिद्ध केले. **संपादक - जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक -अरविंद ओव्हाळ** ( या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही ) ( वाद-विवाद बीड न्याय कक्षेत ) मो. 9022952922

# एकच पक्ष, एकच नेता... राष्ट्रवादी काँग्रेसचे एकनिष्ठ नेते डॉ. गुलदाद पठाण



विहामांडवा/इम्तीयाज शेख

पैठण तालुक्यातील नाव घेण्याजोगे एकनिष्ठ आणि कार्यनिष्ठ व्यक्तिमत्व म्हणजे डॉ. गुलदाद पठाण, सध्या राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरद पवार गट) चे तालुकाध्यक्ष. पक्षाच्या स्थापनेपासून आजपर्यंत एकाच पक्षात राहून त्यांनी सातत्य, निष्ठा आणि नेतृत्वाची परंपरा जपली आहे. २००१ पासून विविध पदांवर कार्य करत — तालुका सरचिटणीस, तालुकाध्यक्ष (अल्पसंख्याक विभाग), जिल्हाध्यक्ष, सरचिटणीस महाराष्ट्र प्रदेश, विधानसभा अध्यक्ष, आणि सध्या तालुकाध्यक्ष या प्रवासात त्यांनी पक्षसंघटनेला नवी ऊर्जा दिली आहे. गावपातळीवरही त्यांचा ठसा कायम आहे — सलग पाच वेळा ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडून येणारे पंचक्रोशीतील एकमेव नेते! उपसरपंच, सरपंच, पंचायत समिती सदस्य आणि गटनेता म्हणून त्यांनी जनतेच्या प्रश्नांसाठी लढा दिला.

आज बारामती ॲग्रो कारखाना पैठण तालुक्यात आणून प्रत्येक वर्षी 1 लाख टन ऊस पाठवत असून एक प्रकारचं शेतकऱ्यानं जीवदान देण्याचे काम करत आहे. शिक्षण, बँकिंग आणि सामाजिक क्षेत्रातही त्यांचे योगदान उल्लेखनीय आहे — विशाल इंग्रजी स्कूल, आयेशा उर्दू स्कूल, गोदावरी पब्लिक स्कूल अँड कॉलेज, विशाल नर्सिंग कॉलेज या संस्थांचे ते सचिव आहेत; तसेच नवगाव अर्बन निधी बँक व नवगाव नागरी पतसंस्था चे चेअरमन आहेत.

गेली 29 वर्षापासून नवगाव या गावात इनशा हॉस्पिटल चे माध्यमातुन दोन्ही दाम्पत्य हे दररोज 100 रुग्णांना अत्यंत अल्पदरात उपचार देण्याचं काम करीत असतात. त्यामूळे दांडगा जनसंपर्क असलेला डॉक्टर व नेता म्हणुन प्रसिध्द. त्यांच्या कार्याचा गाभा एकच — जनसेवा आणि पक्षनिष्ठा. ते स्वत: म्हणतात, "मरेपर्यंत एकच पक्ष — राष्ट्रवादी काँग्रेस, आणि एकच नेता — शरद पवार!"

पत्रकारिता म्हणुन बुलंद आवाज हया मराठी चॅनल चे माध्यमातुन दोन कोटी विएवर्स पर्यंत पोहचून एक आदर्श संपादक म्हणून नावं कमविनारे व्यक्तीमत्व म्हणजे डॉ. गुलदाद पठाण.

जयंत पाटील, आ. सुप्रिया ताई सुळे, आ. रोहीत दादा पवार, आ. संजय भाऊ वाघचौरे यांच्या मार्गदर्शनाखाली काम करत त्यांनी पैठण तालुक्यात राष्ट्रवादी काँग्रेसचा झेंडा उंचावला आहे. एकनिष्ठता, जनसेवा आणि प्रामाणिक नेतृत्व यांचा संगम म्हणजे — डॉ. गुलदाद पठाण! जय हिंद जय महाराष्ट्र जय राष्ट्रवादी!

आगामी जिल्हा परिषद निवडणुकीसाठी नवगाव गटातून उमेदवारी फायनल व फिक्स....... आसून गुप्त बोलणी व संपर्क चालू आहे.

# जंगलतोडीचे परिणाम

जंगलतोड हवामान बदल, ग्लोबल वार्मिंग आणि हरितगृह वायू उत्सर्जनावर नकारात्मक परिणाम करते. त्याच वेळी, पुरामुळे वन्यजीवांचा नाश होतो, मानवी जीवनाची गुणवत्ता कमी होते, महासागरांचे आम्लीकरण होते आणि जैवविविधतेचे हळूहळू नुकसान होते.

## जंगलतोडीचे परिणाम

हवामान असंतुलन आणि हवामान बदल

जंगलतोडीचा हवामानावरही अनेक प्रकारे परिणाम होतो. जंगले ही आपल्या ग्रहाची फुफ्फुसे आहेत. झाडे कार्बन डाय ऑक्साईड घेतात आणि हवेत ऑक्सिजन आणि पाण्याची वाफ सोडतात आणि त्यामुळेच उष्णकटिबंधीय वर्षावन अत्यंत आर्द्र असतात.

झाडे देखील सावली देतात ज्यामुळे माती ओलसर राहते. झाडे नसल्यामुळे हे सर्व धोक्यात आले आहे. यामुळे वातावरणातील तापमानात अस्थिरता, कोरडे हवामान, पर्यावरणासाठी परिस्थिती अधिक कठीण बनते, ज्यामुळे हवामान बदल होतो.

जेव्हा एखादे जंगल कापले जाते तेव्हा आर्द्रता कमी होते, ज्यामुळे उरलेली कोणतीही झाडे सुकतात. उष्णकटिबंधीय पावसाची जंगले सुकल्याने आगीचे नुकसान वाढते, ज्यामुळे जंगले वेगाने नष्ट होतात आणि मानवांना तसेच वन्य प्राण्यांना हानी पोहोचते. जंगल आणि हवामान यांचा अंतर्भाव आहे. जंगलाचा ऱ्हास आणि ऱ्हास हे आपल्या बदलत्या हवामानाचे कारण आणि परिणाम आहे. त्याच वेळी, जंगलतोड ही स्वयंपूर्ण आहे.

त्यामुळे या घटना धोकादायक आहेत आणि जंगलतोडीला चालना देतात. तसेच, झाडांचे नुकसान पूर, मातीची धूप, वाळवंटीकरण आणि उच्च तापमान अधिक जलद आणि वेगाने होऊ देते.

## ग्लोबल वार्मिंगमध्ये वाढ

ग्लोबल वॉर्मिंग नियंत्रित करण्यासाठी झाडे महत्त्वाची भूमिका बजावतात. वातावरणातील संतुलन पुनर्संचयित करण्यासाठी झाडे हरितगृह वायूंचा वापर करतात. सततच्या जंगलतोडीमुळे, वातावरणातील हरितगृह वायूंचे प्रमाण वाढले आहे, ज्यामुळे आपल्या ग्लोबल वार्मिंगच्या समस्या वाढल्या आहेत.

## हरितगृह वायू उत्सर्जनात वाढ

जंगले कार्बन डायऑक्साइड आणि इतर विषारी हरितगृह वायूंचे उत्सर्जन कमी करण्यास मदत करतात. तथापि, जेव्हा ते कापले जातात, जाळले जातात किंवा अन्यथा उत्खनन केले जातात तेव्हा ते कार्बनचे स्त्रोत बनतात.



## मातीची धूप

आपल्या स्थानिक जलचक्रासाठी झाडे देखील महत्त्वपूर्ण आहेत कारण ते वातावरणात पाण्याची वाफ परत करत असतात. पावसाचे पाणी जमिनीत झिरपल्याने माती ओलसर राहते.

झाडांशिवाय, बहुतेक वेळा धूप होते, जमीन जवळच्या नद्या आणि नाल्यांमध्ये ओढते. जंगले निसर्गाचे जलशुद्धीकरण संयंत्र म्हणून काम करतात. मातीची धूप मातीला प्रदूषकांच्या संपर्कात आणते जे पाणी पुरवठ्यामध्ये प्रवेश करतात आणि आपल्या पिण्याच्या पाण्याच्या गुणवत्तेला हानी पोहोचवतात.

## पूर

जेव्हा पाऊस पडतो तेव्हा झाडे आपल्या मुळांच्या मदतीने मोठ्या प्रमाणात पाणी शोषून घेतात आणि साठवतात. जेव्हा ते कापले जातात तेव्हा पाण्याचा प्रवाह विस्कळीत होतो आणि माती पाणी धरून ठेवण्याची क्षमता गमावते. यामुळे काही प्रदेशात पूर येतो आणि काही भागात दुष्काळ पडतो.

## वन्यजीव नष्ट होणे आणि अधिवासाचे नुकसान

वृक्षतोडीमुळे विविध प्राण्यांच्या प्रजाती नष्ट होत आहेत. ते त्यांचे निवासस्थान गमावतात आणि त्यांना नवीन ठिकाणी जाण्यास भाग पाडले जाते. त्यापैकी अनेकांना धोकाही आहे. गेल्या काही दशकांमध्ये आपल्या जगाने वनस्पती आणि प्राण्यांच्या असंख्य प्रजाती गमावल्या आहेत. ब्राझीलच्या ॲमेझॉनच्या अभ्यासात असा अंदाज आहे की पुढील 90 वर्षांपर्यंत अंदाजित 40% नामशेष होतील.

## अम्लीय महासागर

जंगलतोड आणि जीवाश्म इंधन जाळल्यामुळे वातावरणातील कार्बन डायऑक्साईडची वाढती पातळी आपल्या महासागरांना अधिक अम्लीय बनवत आहे. औद्योगिक क्रांतीपासून, समुद्रकिनारे आधीच 30 टक्के अधिक अम्लीय बनले आहेत, ज्यामुळे महासागराच्या प्रजाती आणि परिसंस्था अत्यंत धोक्यात आहेत.

## जीवनाच्या गुणवत्तेत घट

जगभरातील लाखो लोक शिकार, लहान-लहान शेती, मेळावे आणि औषधोपचार यासाठी जंगलांवर अवलंबून आहेत. उष्णकटिबंधीय जंगलांमध्ये आपण दररोज वापरत असलेली सामग्री असते, जसे की लेटेक्स, मशरूम, फळे, नट, नैसर्गिक तेल आणि रेजिन.

जंगलतोड लाखो लोकांच्या जीवावर बेतत आहे. आग्नेय आशियात, जंगलतोड सामाजिक संघर्ष आणि स्थलांतराला कारणीभूत आहे. ब्राझीलमधील गरीब लोकांना त्यांच्या गावातून बंदुकीच्या जोरावर सोयाबीनच्या शेतात खेचले गेले, जिथे त्यांचा छळ करण्यात आला आणि त्यांना अमानवी परिस्थितीत काम करण्यास भाग पाडले गेले.

## भविष्यात अन्न असुरक्षितता

अन्नासाठी जंगलतोड भविष्यात अन्न असुरक्षिततेस कारणीभूत ठरू शकते. सध्या, अन्न उत्पादनासाठी वापरल्या जाणाऱ्या सर्व जमिनीपैकी 52% जमिनीची धूप मध्यम किंवा गंभीरपणे प्रभावित आहे. दीर्घकाळात, सुपीक मातीच्या कमतरतेमुळे कमी उत्पादन आणि अन्नाची असुरक्षितता होऊ शकते.

## जैवविविधतेचे नुकसान

जंगलतोडीमुळे जैवविविधतेचे मोठ्या प्रमाणात नुकसान होते. जागतिक जैवविविधतेपैकी सुमारे 80% उष्णकटिबंधीय वर्षावनांमध्ये आढळते. जंगले केवळ वन्यजीवांसाठी अधिवासच पुरवत नाहीत तर वैद्यकीय संरक्षणालाही मदत करतात.

विविध प्रजातींचे संरक्षण करण्यासाठी जंगल हे एक महत्त्वाचे वातावरण आहे. हे स्वच्छ पाणी तयार करण्यासाठी, प्रदूषक काढून टाकण्यासाठी आणि पोषक तत्वांचा पुनर्वापर करण्यासाठी जबाबदार असलेल्या सूक्ष्मजीव समुदायाचा नाश करते.

# अर्जुना एज्युकेशनल ग्रुप व इंजि. कृष्णा नागरगोजे यांच्या मार्गदर्शनाखाली एस.टी. विद्यार्थिनीचा न्यायासाठी लढा!!

● पान १ वरून... तीच संधी नाकारल्याचा गंभीर मुद्दा या याचिकेत मांडण्यात आला आहे.

अक्षरा मोरे हिला के. डी. शेंडगे आयुर्वेदिक मेडिकल कॉलेज, उमरगा (धाराशिव) येथे कॅप फेरी क्रमांक २ मध्ये बी.ए.एम.एस. अभ्यासक्रमासाठी प्रवेश मिळाला होता. मात्र तिचे जातवैधता प्रमाणपत्र पडताळणी प्रक्रियेत असल्याने सीईटी सेलने तिचा प्रवेश रद्द केला. संबंधित समितीकडून प्रमाणपत्र काहीच दिवसांत मिळणार असल्याचे सांगण्यात आले होते. तरीदेखील मुदतवाढ न दिल्याने तिचा प्रवेश रद्द करण्यात आला. या निर्णयामुळे तिच्यासह अनेक एस.टी. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले आहे.

ही याचिका अर्जुना एज्युकेशनल ग्रुप आणि इंजि. कृष्णा नागरगोजे सर यांच्या मार्गदर्शनाखाली दाखल करण्यात आली आहे. संस्थेने विद्यार्थिनीला कायदेशीर सल्ला, आवश्यक कागदपत्रांची मदत तसेच मानसिक आधार देत न्याय मिळवून देण्यासाठी पुढाकार घेतला आहे.

इंजि. कृष्णा नागरगोजे सर म्हणाले, "समान परिस्थितीत असलेल्या इतर आरक्षण प्रवर्गांना मुदतवाढ देण्यात आली, मात्र एस.टी. विद्यार्थ्यांना ती संधी नाकारणे हा स्पष्ट अन्याय व भेदभाव आहे. शिक्षणात समानता आणि विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी आम्ही न्यायालयाचा दरवाजा ठोठावला आहे."

अर्जुना एज्युकेशनल ग्रुप चे प्रतिनिधी म्हणाले, "आमचे ध्येय प्रत्येक विद्यार्थ्याला त्याच्या हक्काचं शिक्षण मिळवून देणं आहे. समाजातील वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही सातत्याने कार्यरत राहू. या प्रकरणात न्याय मिळाल्यास राज्यातील असंख्य विद्यार्थ्यांना दिलासा मिळेल."

अर्जदाराने न्यायालयाकडे मागणी केली आहे की, एस.टी. विद्यार्थ्यांनाही जातवैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ देण्यात यावी आणि आधीचा प्रवेश वैध धरावा. या प्रकरणाचा निकाल राज्यातील शेकडो एस.टी. विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी मार्गदर्शक ठरेल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे.

# दिवाळीनिमित्त परप्रांतीय विद्यार्थ्यांसाठी स्नेहमिलन — कृषि महाविद्यालयाचा स्तुत्य उपक्रम : माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण




लातूर (प्रतिनिधी) : कृषि महाविद्यालय, लातूर येथे देशाच्या विविध प्रांतांमधून विद्यार्थी कृषि शिक्षण व संशोधनासाठी येतात. परंतु दिवाळीसारख्या सणांमध्ये अनेक विद्यार्थी घरी जाऊ शकत नाहीत आणि आपल्या कुटुंबियांसोबत उत्सव साजरा करण्याची संधी त्यांना मिळत नाही. या पार्श्वभूमीवर कृषि महाविद्यालय, लातूर यांच्यातर्फे तसेच कर्मयोगी डॉ बालासाहेब ठोंबरे-पाटील स्मृती प्रतिष्ठान, उंदरी, साई प्रात:चल चमू, लातूर, रोटरी क्लब ऑफ लातूर मेट्रो, लातूर आणि एडीएम ॲग्रो इंडस्ट्रीज, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने परप्रांतीय विद्यार्थ्यांसाठी दिवाळी स्नेहमिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी वनामकृवि, परभणीचे माजी कुलगुरू डॉ. अशोक ढवण होते. प्रमुख पाहुण्यांमध्ये माजी प्राचार्य डॉ. बाळासाहेब चव्हाण, अधिष्ठाता डॉ. बाबासाहेब ठोंबरे, प्राचार्य डॉ. अंगद सूर्यवंशी, पदव्युत्तर कृषि व्यवसाय व्यवस्थापन संस्थेचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. संतोष कांबळे, डॉ. प्रा. विनोद चव्हाण तसेच राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त माजी पोलीस अधिकारी सय्यद रहमान यांचा समावेश होता. यावेळी बोलताना डॉ. ढवण म्हणाले, "सामाजिक उत्तरदायित्व जपत परप्रांतीय विद्यार्थ्यांसाठी दिवाळी स्नेहमिलनसारख्या कार्यक्रमांचे आयोजन करणे हा अत्यंत स्तुत्य उपक्रम आहे. या महाविद्यालयाने ही परंपरा केवळ जोपासली नाही, तर समाजातील विविध स्तरांतील संस्थांना एकत्र आणून एक आदर्श घालून दिला आहे. या उपक्रमातून विद्यार्थ्यांमध्ये बंधुभाव, सहिष्णुता आणि एकात्मतेची भावना वृद्धिंगत होते."

अधिष्ठाता डॉ. ठोंबरे म्हणाले, "लातूरच्या कृषि महाविद्यालयाने शैक्षणिक, पर्यावरणीय व सामाजिक भान जपत 'लातूर पॅटर्न' निर्माण केला आहे. या पॅटर्नचा विस्तार व्हावा, यासाठी समाजातील विविध संस्था सहभागी होणे काळाची गरज आहे."

या प्रसंगी डॉ. बाळासाहेब चव्हाण, डॉ. अंगद सूर्यवंशी, डॉ. संतोष कांबळे, सय्यद रहमान, साई प्रात:चल चमूचे शिवाजी गिरी, कुणाल घुंगार्डे, रोटरी क्लबचे धनराज बिरादार, कालिदास लांडगे आणि गंगाधर गवळी, आणि राजेश संन्यासी, अनुराधा सूर्यवंशी- ठोंबरे यांनीही विद्यार्थ्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. विद्यार्थिनी ब्युटी दाई आणि निर्मल कुमार यांनी कार्यक्रमाबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. विजय भामरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन राष्ट्रीय सेवा योजनेचे डॉ. अनिलकुमार कांबळे यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. अनंत शिंदे, डॉ. वसंत सूर्यवंशी, डॉ. प्रभाकर अडसूळ, सुधीर सूर्यवंशी आणि मीना साठे यांनी परिश्रम घेतले. या स्नेहमिलनात महाराष्ट्रातील तसेच परप्रांतीय विद्यार्थी, अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने सहभागी झाले आणि एकत्रितपणे दीपावलीचा आनंद लुटला.

# मोंथा चक्रीवादळ: आज रात्री आंध्र प्रदेशावर धडकणार! ओडिशा आणि तामिळनाडूमध्येही धोक्याचा इशारा



काकीनाडा : बंगालच्या उपसागरातून आलेले 'मोंथा' चक्रीवादळ अधिक तीव्र झाले असून, ते आज मंगळवार, २८ ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री आंध्र प्रदेशच्या किनारपट्टीवर काकीनाडा जवळ धडकणार आहे.


'मोंथा' चक्रीवादळ वेगाने उत्तर-उत्तर-पश्चिम दिशेने सरकत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार, आज रात्री उशिरा हे वादळ मछलीपट्टनम आणि कलिंगपट्टनम दरम्यान काकीनाडाजवळ किनाऱ्याला धडकेल. लँडफॉलच्या वेळी वाऱ्याचा कमाल वेग ९० ते १०० कि.मी. प्रतितास असेल, जो ११० कि.मी. प्रतितास पर्यंत वाढण्याची शक्यता आहे. वादळ धडकताना समुद्रात एक मीटरपेक्षा अधिक उंचीच्या लाटा उसळण्याची भीती आहे. यामुळे किनारपट्टीच्या सखल भागांत पाणी शिरण्याचा धोका आहे. आंध्र प्रदेशातील काकीनाडा, कोनासीमा, पश्चिम गोदावरी, एलुरू आणि पूर्व गोदावरी या जिल्ह्यांसह एकूण १६ जिल्ह्यांमध्ये 'रेड अलर्ट' (अतिदक्षता) जारी करण्यात आला आहे.

आंध्र प्रदेशात आज (२८ ऑक्टोबर) आणि उद्या (२९ ऑक्टोबर) काही ठिकाणी अतिवृष्टी ते अतिवृष्टीपेक्षा जास्त पाऊस (२० सेमी पेक्षा अधिक) होण्याची शक्यता आहे.

## तीन राज्यांमध्ये मोठा परिणाम

आंध्र प्रदेश : वादळाचा सर्वाधिक धोका असलेल्या किनारपट्टीवरील गावांमधून जवळपास १०,००० हून अधिक लोकांना सुरक्षित निवारा केंद्रांमध्ये हलवण्यात आले आहे. यामध्ये सुमारे १२६ गर्भवती महिलांना रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

# महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दु:ख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी (हिंदी)
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळ्लाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंत:करण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - ** अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंत:करण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | न्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |

विशेष



## कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री राहूल सुर्यतळ यांना त्यांच्या धाडाकेबाज कार्याच्या बातम्यांचा संग्रह भेट

माजलगाव : येथील शहर पोलीस स्टेशन चे कर्तव्यदक्ष पोलीस निरीक्षक श्री राहूल सुर्यतळ यांनी त्यांच्या काळात अनेक धाडाकेबाज कार्यवाह्या करून नाव लौकिक मिळवले आहे त्यांच्या कार्याच्या बातम्यांचा संग्रह देतांना दै. वास्तव चे निवासी संपादक अरविंद ओव्हाळ व पत्रकार विष्णू दादा उगले.

## डॉ. संपदा मुंडे यांच्या मारेकऱ्यांवर कठोर कारवाईसाठी माजी आमदार नारायणराव मुंढे यांचे उपोषण



बीड : प्रतिनिधी

दिनांक 27 ऑक्टोबर 2025 रोजी बीड जिल्हाधिकारी कार्यालय समोर डॉक्टर नारायणराव मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली फलटण येथील डॉक्टर संपदा मुंडे या मेडिकल ऑफिसर यांना आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याच्या निषेधार्थ एकदिवसीयलक्षणिक उपोषण करण्यात आले. यावेळी डॉक्टर संपदा मुंडे व त्यांच्या परिवाराला न्याय मिळावा व लवकरात लवकर एसआयटीची स्थापना करून दोशींवर कठोर कारवाई व्हावी यासाठी हे एक दिवसीय लाक्षणिक उपोषण करण्यात आले होते.

सातारा जिल्ह्यातील फलटण येथे डॉक्टर संपदा मुंडे ंनी वरिष्ठ पोलीस अधिकारी व काही राजकीय पुढाऱ्यांच्या सतत होणाऱ्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केली आहे याबाबत त्यांनी स्वत:च्या हातांवर संबंधित जोशींचे नावे देखील लिहून ठेवले आहेत तसेच ही घटना अत्यंत दुर्दैवी व माणुसकीला काळीमा फासणारी आहे एक उच्चशिक्षित डॉक्टर तरुणीवर अनेक दिवसांपासून त्रास होत असून शेवटी आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले आहे आरोपी हे कायद्याचे रक्षक आहेत तसेच एका कारखानदाराच्या पीए च्या मोबाईलवरून देखील सतत दबाव टाकून चुकीचे कामे करण्यास त्या डॉक्टर तरुणीवर दबाव टाकला जात होता.

विशेष म्हणजे या पोलिसांकडून होणाऱ्या त्रासाबद्दल या डॉक्टर तरुणीने याआधी पोलीस विभागाचे उपविभागीय अधिकारी यांच्याकडे देखील 19 जून 2025 रोजी संबंधित अधिकारी हे कशाप्रकारे त्रास देत आहेत ते सविस्तरपणे तक्रारी मध्ये लिहिले होते मात्र त्या तक्रारीशी कुठल्याही प्रकारची दखल अथवा चौकशी देखील केली नाही. सदरील प्रकरणांमध्ये जे कोणी पोलीस अधिकारी वैद्यकीय अधिकारी यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करून त्यांना सेवेतून बडतर्फ करण्यात यावे व या नराधमांना कठोर शिक्षा ही झालीच पाहिजे व धमकी देणारे दोषी जे कोणी आजी–माजी खासदार आहेत त्यांच्यावर देखील कारवाई करून त्यांना आरोपी क्रमांक एक करावे याप्रकरणी एसआयटी मार्फत चौकशी करून त्वरित कारवाई करावी, सदरील खटला हा फास्टट्रॅक कोर्ट मध्ये चालून दोषी असणाऱ्या आरोपींना फाशीची शिक्षा द्यावी ।मध्ये दोषी असणाऱ्या राजकीय पुढाऱ्यांना कोणीही पाठीशी घालू नये. नसतं दिनांक पाच डिसेंबर 2025 रोजी बीड ते फलटण पायी मोर्चा काढण्याचा इशारा डॉक्टर नारायणराव मुंडे यांनी सरकारला दिला आहे व कायदा व सुव्यवस्थेच्या प्रश्नाला सर्वस्वी सरकार जबाबदार राहील. यावेळी उपस्थित आष्टी पाटोदा विधानसभा मतदारसंघाची माजी आमदार श्री भीमराव धोंडे हे देखील उपस्थित होते, अखिल भारतीय समता परिषदेचे बीड जिल्हाध्यक्ष श्री सुभाष राऊत, डॉक्टर फेडरेशनचे सर्व डॉक्टर्स देखील उपस्थित होते, श्री सुघोष मुंडे, ॲड .विराज राख, संगीतादसे, सुरेश जी राका, बाळासाहेब मोरे पाटील, अशोक जी येडे, श्री माऊली शिरसाट, श्री मोहन आघाव, श्री अभय वनवे, श्री ऋषिकेश महानोर, परमेश्वर वाघमोडे, शेख युनूस व बीड जिल्ह्यातून डॉक्टर्स वकील व अनेक बुद्धिजीवी वर्ग या लाक्षणिक उपोषणाच सहभागी झाले होते.



## माजलगाव टाईम्सचे निवासी संपादक कुलथे यांचे निधन

➤ माजलगाव : प्रतिनिधी



दै. माजलगाव टाईम्सचे निवासी संपादक कमलाकर कुलथे यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५८ वर्षे होते. त्यांच्या निधनाने हळहळ व्यक्त केली जात आहे.

ते सर्वत्र परिचित असणारे पत्रकार होते. त्यांच्या पश्चात तीन भाऊ, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी असा मोठा परिवार आहे.

कुलथे कुटूंबियांच्या दु:खात वास्तव परिवार सहभागी आहे.







# अरे देवा...!!! तिन सदस्याच्या समितीने नदीकाठच्या शेतकऱ्यांना सोडले वाऱ्यावर !

## ➤ तात्काळ पंचनामे न झाल्यास अमरण उपोषणाचा शेतकऱ्यांचा इशारा !

**जीवंतपणी मदतीला कोणीयेईना अन् टोकाचे पाऊल उचलल्यावर मदतीचा ओघ काही संपेना अशी अवस्था शेतकऱ्यांची झाली आहे. वारंवार मागणी करूनही शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे नाहीत. मदत कधी मिळणार तेही समजत नाही. अशा परिस्थितीत शेतकरी हवालदिल झाला आहे.**



विहीर वाहून गेली जमीन खरडून गेली ..एक महीना झालं तरी पंचनामे झाले नाहीत ही शेतकऱ्यांची शोकांतिका आहे



अतिवृष्टी अगोदर जोमात आलेले सोयाबीन पीक



अतिवृष्टी नंतर पिकांची अशी अवस्था झाली

➤ **माजलगाव : अरविंद ओव्हाळ**

तालुक्यातील नद्यांना महापुर येउन साधारणत: जवळपास एक महिणा लोटला असुन या महापुरामुळे नदीकाठच्या बाधित शेतक–यांच्या पिकाचे, विहीरींचे व खरडुन गेलेल्या जमिनीचे पंचनामे करण्यासाठी जिल्हाधिकारी यांनी तीन सदस्यांची समिती नियुक्त केली होती मात्र आपसांतील मतभेदांमुळे व समन्वयाच्या अभावामुळे या तिन सदस्यांच्या समितीने अद्यापही बाधित जमिनीचे पंचनामे केले नसुन हे नुकसान शासन देत आहे. परंतु अधिका–यांच्या मस्तवाल धोरण शेतक–यांच्या पदरात पडण्यास अडचणी निर्माण करत आहे. त्यामुळे आमदार साहेब येणा–या दोन दिवसांत आपण या अधिका–यांची बैठक घेवुन या बाधित शेतक–यांचे पंचनामे पुर्ण करावेत अन्यथा तहसिल कार्यालयासमोर अमरण उपोषण करण्याचा इशारा मोगरा येथील शेतक–यांनी दिला आहे.

माजलगाव तालुक्यामध्ये प्रामुख्याने सिंदफणा व गोदावरी या मोठ्या नद्या आहेत. या नद्याला महापुर आल्यामुळे मोगरा गावाला पाण्याचा अजगरी विळखा पडला होता. या अजगरी विळख्यात साधारणत: २५ ते ३० शेतक–यांचे उभे पिक नासुन गेले. यामध्ये कापुस, सोयाबीन या पिकांवर पाच फुट उंचीपर्यंतचे पाणी आठ दिवस होते. अशी दयनीय अवस्था या पिकांची झाली होती. साधारण १५ ते २० दिवस झाल्यानंतर आजही या पिकांचे करायचे काय ? पंचनामे झाल्याशिवाय शेतक–यांना शेतीची मशागत करणे अवघड झाले आहे आणि हे मस्तवाल अधिकारी आपसांतील भांडणात शेतक–यांना वा–यावर सोडत आहेत. या त्रिस्तरीय समितींमध्ये कृषि सहाय्यक, तलाठी व ग्रामसेवक यांनी मिळुन हे पंचनामे करावेत असे शासनादेश असतांना सुध्दा या मंडळींनी शेतक–यांची क्रुर चेष्टा लावली आहे. आमदार आपण आजच या तिनही अधिका–यांना सुचना करून हे पंचनामे तात्काळ करावेत व हा अहवाल शासनाकडुन सरकारकडे पोहचवावा ज्यामुळे शेतक–यांना आर्थिक मदततर मिळेलच परंतु या जमिनीची मशागत करून त्यांना या जमिनीची ओटी भरण्यासाठी रब्बीची पेरणी करता येईल हे पंचनामे जर तात्काळ न झाले तर उपोषणाशिवाय आम्हां शेतक–यांना पर्याय नाही असा इशारा मोगरा गावातील शेतक–यांनी दिलेल्या निवेदनात दिला आहे. यासंबंधी तहसिलदार यांना विचारले असता त्यांनी पुर्णत: हा विषय कृषि खात्याकडे आहे असे सांगुन आपली जबाबदारी झटकली तर कृषि अधिकारी यांना याबाबत विचारणा केली असता आम्हाला तहसिलकडुन याबाबत कोणतेच सहकार्य मिळत नसल्याचे सांगुन त्यांनीही जबाबदारी झटकली. कार्यालयाचे आपसांत जमत नाही मात्र याचा फटका शेतक–यांना बसतो आहे. याचा पुर्णत: सन्माननीय मार्ग आमदार महोदयांनी काढावा अशी मागणी शेतकरी वर्गातुन होत आहे.

यावेळी उमेश मोगरेकर, तुकाराम राठोड, बळीराम चव्हाण, गणेश जाधव, प्रकाश खिस्ते यांचेसह मोगरा गावातील अनेक शेतकरी उपस्थित होते.

## लोकनेते सोळंके कारखान्याचा ३४ वा गाळप हंगाम, महंत व मान्यवरांच्या हस्ते आज गव्हाण पुजन

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

लोकनेते सुंदररावजी सोळंके साखर कारखान्याचा सन २०२५\२६ च्या ३४ व्या ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ आज दि.२८ ऑक्टोबर रोजी नारायण गड संस्थानचे ह.भ.प.गुरूवर्य महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते व आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे.तरी या कार्यक्रमास ऊसउत्पादक, सभासद शेतकरी, सर्व ठेकेदार आदिंनी उपस्थित राहावे.असे आवाहन करण्यात आले आहे.

तेलगाव येथील लोकनेते सुंदररावजी सोळंके सहकारी साखर कारखान्याचा सन २०२५\२६ चा ३४ वाहतुक ऊस गळीत हंगामाचा शुभारंभ आज दि.२८ ऑक्टोबर रोजी दुपारी १२–१५ वाजता श्रीक्षेत्र नारायण गड संस्थानचे ह.भ.प.गुरूवर्य महंत शिवाजी महाराज यांच्या शुभहस्ते गव्हाण पुजन करून व गव्हाणीत ऊसाची मोळी टाकुन व कारखान्याचे मार्गदर्शक आ.प्रकाश दादा सोळंके यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात येणार आहे.यावेळी जेष्ठ मार्गदर्शक धैर्यशील काका सोळंके, चेअरमन विरेंद्र दादा सोळंके, व्हा.चेअरमन जयसिंह भैया सोळंके आदिसह सर्व संचालक मंडळ उपस्थित राहणार आहेत. सन २०२५\२६ गळीत हंगामासाठी कार्यक्षेत्रात १३,७०० हेक्टर ऊसाचे नोंद असून इतर विल्हेवाट वजा जाता कारखान्याने निश्चित केलेले १० मे टन ऊस गाळप आणि ४ कोटी लिटर इथेनॉल व ६.५१ युनिट विज निर्मीती व निर्यात उद्दीष्ट ठेवले असुन, हे उद्दिष्ट करण्यासाठी कारखान्याने सर्वतोपरी नियोजन केलेले असुन, कार्यक्षम ऊसतोड, वाहतुक यंत्रणेचे करार पुर्ण करून यंत्रणा भरती करण्यात आली आहे.

गाळप हंगामासोबतच कारखान्याचा आसवाणी प्रकल्प व को जनरेशन प्रकल्प ही पुर्ण क्षमतेने सुरू करण्यात येणार आहे.तरी या कार्यक्रमास कारखान्याचे सर्व सभासद ऊस उत्पादक शेतकरी विविध संस्थांचे पदाधिकारी, ऊस तोडणी वाहतुक ठेकेदार, हितचिंतक आदि सर्वांनी उपस्थित राहावे. असे आवाहन कार्यकारी संचालक आर.सी.बडगुजर यांनी केले आहे.

## बीडच्या उसतोड कुटुंबावर कर्नाटकात दुःखाचा डोंगर ; ट्रॉलीतून निसटून चिमुकलीचा करून अंत

➤ **माजलगाव :** ऊसतोड कामगारांच्या स्थलांतराचा हृदयद्रावक चेहरा पुन्हा एकदा समोर आला आहे.

या विषयी समजलेली माहिती अशी की, धारूर तालुक्यातील देवदहिफळ येथील अडीच वर्षीय आरोही विशाल बडे या चिमुकलीचा कर्नाटक राज्यातील कोल्हारजवळ ट्रॅक्टरच्या ट्रॉलीखाली चिरडून दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना रविवारी सकाळी साडेदहा वाजता घडली. एकुलती एक मुलगी अपघातात गमावल्याने बडे कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. देवदहिफळ येथील महादेव बडे हे ऊसतोड मुकादम आहेत. त्यांचे पुत्र विशाल बडे हे कर्नाटक राज्यातील बैलहोंगल तालुक्यातील सोमेश्वर सहकारी साखर कारखान्याकडे ऊस वाहतुकीचे काम पाहतात. शुक्रवारी रात्री विशाल बडे हे पत्नी आरती, मुलगा अविराज आणि मुलगी आरोहीसह ट्रॅक्टरने कर्नाटकला कामासाठी निघाले होते. ऊसतोड कामगारांच्या मुलांच्या नशिबी येणारे हे स्थलांतरण या निष्पाप जीवासाठी अखेरचे ठरले.

## "न्याय न मिळाल्यास टॉवरवरून उड्या मारू!" — ग्रामस्थांचा 'शोले स्टाईल' इशारा

### ➤ गायकवाड व कोळी यांच्या हस्तक्षेपाने टळली दुर्घटना ➤ ग्रामसेवकावरील चौकशीचा अहवाल वरिष्ठांकडे



➤ **माजलगाव : अरविंद ओव्हाळ**

मंजरथ ग्रामपंचायतीतील भ्रष्टाचार आणि दलितविरोधी वर्तनाविरोधात ग्रामस्थांनी सोमवारी 'शोले स्टाईल' आंदोलन छेडत प्रशासनाला अक्षरश: जाग आणली. "न्याय न मिळाल्यास टॉवरवरून उड्या मारू!" असा इशारा देत ग्रामस्थ टॉवरवर चढल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. अखेर सहाय्यक गटविकास अधिकारी गायकवाड आणि ग्रामीण पोलीस निरीक्षक बालक कोळी यांनी हस्तक्षेप करून परिस्थिती नियंत्रणात आणली.

ग्रामसेवक दिनेश राऊत यांच्यावर भ्रष्टाचार, दलित निधीचा गैरवापर, बोगस घरकुल बिलं आणि दारूच्या नशेत कामकाजाचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. या संदर्भात ग्रामस्थ भिमराव कदम आणि प्रल्हाद डावरे यांनी पंचायत समिती माजलगाव येथे निवेदन देऊन संबंधित ग्रामसेवकावर कारवाईची मागणी केली होती.



मात्र, वेळेत कारवाई न झाल्याने ग्रामस्थांचा संताप उसळला.२७ ऑक्टोबर रोजी सकाळी ग्रामस्थांनी टॉवरवर चढत घोषणाबाजी सुरू केली. "आमचा आवाज कोणी ऐकत नाही, आता टॉवरवरून उड्या मारू!" या घोषणांनी वातावरण तणावपूर्ण बनले. ग्रामपंचायत परिसरात नागरिकांची गर्दी झाली आणि प्रसंग हाताबाहेर जाण्याची शक्यता निर्माण झाली. दरम्यान, सहाय्यक गटविकास अधिकारी गायकवाड व ग्रामीण पोलीस निरीक्षक बालक कोळी तात्काळ घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आंदोलनकर्त्यांशी चर्चा करत संबंधित ग्रामसेवकाच्या प्रकरणी चौकशी सुरू असल्याचे सांगितले. चौकशी पूर्ण करून अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठवण्यात आल्याची माहिती त्यांनी दिली .प्रशासनाकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर ग्रामस्थांनी टॉवरवरून खाली उतरून आंदोलन मागे घेतले. "जर चौकशी केवळ कागदावर राहिली, तर याहून तीव्र आंदोलन करू," असा इशारा देत ग्रामस्थांनी संताप व्यक्त केला .या 'शोले स्टाईल' आंदोलनामुळे मंजरथ आणि परिसरात दिवसभर चर्चा रंगली असून, ग्रामसेवक दिनेश राऊत यांच्या चौकशीच्या निष्कर्षाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण ➤ रोशनपुरी ते परभणी फाटा रोडवरील खड्डे बुजवले

# रूपामाता शुगर युनिट यांच्या वतीने रस्ता दुरुस्ती

➤ **माजलगाव : प्रतिनिधी**

तालुक्यातील रोशनपुरी ते परभणी रोड पर्यंत गेल्या काही महिन्यांपासून रस्त्याची अवस्था अत्यंत खराब झाली होती. खड्डेमय रस्त्यामुळे नागरिक, शेतकरी तसेच वाहनचालक त्रस्त झाले होते. या समस्येची दखल घेत रूपामाता शुगर युनिट नं. २ यांच्या वतीने या रस्त्याची दुरुस्ती, खड्डे बुजवणे आणि रस्त्याच्या कडेला वाढलेली झाडे–झुडपे काढण्याचे काम हाती घेण्यात आले.



● ॲड .व्यंकटराव गुंड, अध्यक्ष रूपमाता शुगर युनिट

रस्त्याच्या दोन्ही बाजूंचे झुडपे व गवत काढल्यामुळे वाहतुकीस सुलभता निर्माण झाली असून, रस्ता अधिक सुरक्षित बनला आहे. रूपामाता शुगर युनिटच्या सामाजिक बांधिलकीतून हे कार्य पार पडल्यामुळे स्थानिक ग्रामस्थांनी युनिटचे कौतुक केले आहे. स्थानिक शेतकरी व वाहनचालकांनी सांगितले की, "या रस्त्यामुळे आमचा ऊस वाहतूक मार्ग आणि दैनंदिन प्रवास सुकर झाला आहे. खड्डे बुजवले गेल्यामुळे अपघाताचा धोका कमी झाला आहे."रूपामाता शुगर युनिट नं. २ च्या या उपक्रमामुळे परिसरातील ग्रामस्थ आणि शेतकरी वर्गामध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले आहे.



